**5 वे अटल बिहारी वाजपेयी स्मृती व्याख्यान**

08 डिसेंबर 2025

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या वतीने 09 डिसेंबर 2025 रोजी 1800 वाजता 5 व्या अटल बिहारी वाजपेयी स्मृती व्याख्यानाचे आयोजन केले जाईल. श्री. तेओ ची हेन (सिंगापूरच्या पंतप्रधानांचे वरिष्ठ सल्लागार आणि टेमासेक होल्डिंग्सचे चेअरमन) हे "बदलत्या जगात शाश्वत भागीदारी" या विषयावर व्याख्यान देतील.

2. ही वार्षिक स्मृती व्याख्यानमाला दिवंगत श्री अटल बिहारी वाजपेयी यांना श्रद्धांजली म्हणून आयोजित केली जाते. राष्ट्रनिर्मिती आणि भारताच्या परराष्ट्र धोरणात परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि पंतप्रधान म्हणून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्याचा हा उपक्रम आहे.

3. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वरुन ही व्याख्यानमाला थेट प्रसारित केली जाईल.

**नवी दिल्ली**

08 डिसेंबर 2025